# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १७१/२०११-१२ दिनांक :

श्री. लालासो जालींद्र शिंदे,
मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली

— विरुध्द पक्षकार

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. लालासो जालींद्र शिंदे, मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली या ग्राहकाचे रहिवाशी कारणासाठीचे ग्राहक क्र. २७०००१०३३६५४३ या क्रमांकाने ०.२० के.डब्ल्यू.चे कनेक्शन दि. ७.१.१९९८ पासून चालू आहे. सदर ग्राहकास दिलेली बीले ग्राहकाने भरल्याचे सी.पी.एल. वरुन दिसून येते. सदर ग्राहकास जुलै २००३ पर्यंत ९००००८८५५० क्रमांकाचे मीटर चालू होते.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

त्यानंतर ऑक्टोबर २००३ पासून मीटर क्र. ९००८१५७३३२ हे कनेक्शन प्राथमिक रिडींग ०१ पासून दि. ३.३.२०१२ पर्यंत रिडींग ९४२६ येथपर्यंत चालू होते. त्यानंतर सदरचे मीटर बदलले आहे व त्या जागी मीटर क्र. ७५/ ०१९८२५११ बसविले आहे. प्रदीर्घ काळात चालू असलेले मीटर वरील ऑक्टोबर २०११ मध्ये वि.प.ने दिलेले ३१७३ इतक्या युनिट वापराचे बीलामुळे ग्राहकाने प्रथमतः अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली व नंतर मंचापुढे न्याय निर्णयासाठी तक्रार अर्ज केला आहे. मंचाने सदरचा अर्ज दाखल करुन घेऊन उभयतांना सुनावणीसाठी पाचारण केले. सुनावणीवेळी कागदपत्रांची पूर्तता वि.प.ने न केल्याने मंचाने वि.प.कडे पाठपुरावा करुन कागदपत्रे हजर करुन घेतली आहेत व त्यावर न्याय निर्णय केला आहे, त्यामुळे विलंब झाला आहे. ऑक्टोबर २०११ च्या तिमाही वापरामध्ये ३१७३ इतके युनिटचे दिलेले बील योग्य आहे. सदरचा मीटर फास्ट असल्याबद्दल कोणतीही शंका ग्राहकाने उपस्थित केलेली नाही किंवा तसा उल्लेखही केलेला नाही. सदर जागेत दोन भाडेकरु रहात असलेने त्यांनी आपल्या घरगुती कारणासाठी वापरलेली उपकरणे व त्यासंबंधीचा विचार करतां ३१७३ युनिट किंवा त्यापेक्षा जादा वापर होऊ शकतो असे प्रतिपादन नोडल ऑफीसर, सांगली व कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांनी आपल्या म्हणण्यात नमूद केले आहे व कंपनीने दिलेले बील योग्य आहे, त्यामुळे सदरचे बील भरण्याचा आदेश मंचाने पारीत करावा असे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे मीटर तपासला आहे, सदर मीटर योग्य स्थितीत व योग्य पध्दतीने चालत आहे असे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे दि. १३.१२.२०११ रोजी जागेची पहाणी करुन Spot Verification Report केलेला आहे व तोही मंचास सादर केला आहे. त्याचप्रमाणे दुरुस्त केलेले ऑक्टोबर २०११ चे व एप्रिल २०१२ चे बील मंचासमोर सादर केले आहे. वि.प.ने अशी मागणी केली आहे की दुरुस्त करुन दिलेल्या देयकाप्रमाणे रु. १८,१५०/- इतकी रक्कम ग्राहकाने भरणे उचित आहे. तसा आदेश मंचाने पारित करावा अशी विनंती केली आहे. ग्राहकाची व वि.प. या उभयतांनी मंचासमोर दाखल केलेली कागदपत्रे, लेखी म्हणणे, सुनावणी दरम्यानची कथने या सर्वांचा परामर्श घेता, न्याय निर्णयासाठी मंचासमोर खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) ऑक्टोबर २०११ चे ३१७३ युनिट वापराचे बील दुरुस्त करुन देणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय, दुरुस्त करुन देणे योग्य आहे.

२) इतर मार्गदर्शक सूचना वि.प.स देणे योग्य आहे किंवा कसे ?

उत्तर : होय, मार्गदर्शक सूचना देणे आवश्यक आहे.

३) आदेश ?

उत्तर : अंतिम आदेशाप्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

श्री. लालासो जालींद्र शिंदे यांनी मंचाकडे ऑक्टोबर २०११ चे बील जादा युनिटचे आले असल्याबद्दल तसेच सदरचे बील मजला मान्य नसल्याचे नमूद केले आहे. आपल्या तक्रारीत प्रतिनिधी मार्फत तक्रार मांडत असतांना ३१७३ इतक्या युनिटचे बील हे वेळच्यावेळी योग्य पध्दतीने मीटर रिडींग न घेतल्यामुळे आलेले आहे. त्यामुळे वेळच्यावेळी मीटर रिडींग न घेतल्याबद्दल विनियमातील तरतुदीनुसार बील दुरुस्त करुन मिळावे अशी मागणी केलेली आहे.

This document was created using Smart PDF Creator To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

याही बाबीचा विचार करतां, मंचाने सी.पी.एल. वरील नोंदी बघितल्या. वाद असणारे मीटर ऑक्टोबर २००३ पासून पुढे चालू आहे. सदर काळात किमान १७ व कमाल ९१० इतक्या युनिटची नोंद झाल्याचे दिसून येते. ग्राहकही त्या गोष्टीशी सहमत आहे. सदरचे नोंद तिमाहीमध्ये एकदा करण्यात आली आहे. ग्राहकाने वि.पने दिलेली बीले भरलेली आहेत. सी.पी.एल. वरील नोंदी पहातां, मिटरच्या बाबतीत ' नॉर्मल ' असाच शेरा सर्वत्र नोंदविल्याचे दिसून येते, फक्त ऑक्टोबर २०१० व एप्रिल २०११ या काळात रिडींग उपलब्ध नाही म्हणजे RNA असे शेरे मारल्याचे दिसून येते. मीटर तपासणी विभागाने मीटर तपासला आहे, तो सुस्थितीत व योग्य ते रिडींग दाखवत असल्याचा अहवाल मंचासमोर सादर केला आहे. वेळच्यावेळी रिडींग न घेतल्यामुळे ही चूक वि.प.च्या लक्षात आलेली असल्यानेच वि.प.ने ३० महिन्यांचे बील ऑक्टोबर २०११ मध्ये दुरुस्त करुन दिले आहे. वि.प.ने आपल्या लेखी म्हणण्यात जे भाडेकरु रहात होते व त्या संबंधीचा वापर याचा जो उल्लेख केला आहे तो जर तर स्वरुपात असल्याने मंचाने त्याचा विचार केलेला नाही व करणे योग्य नाही. मंचापुढे आता मुद्दा उपस्थित होतो की, बील दुरुस्त करुन देतांना विनिमयातील तरतुदीशी सुसंगत बील देणे योग्य आहे किंवा कसे ? विनियमातील तरतुदीनुसार काम करणे मंचावर बंधनकारक असल्याने तसाच निर्णय देणे योग्य आहे या निर्णयाप्रत मंच आला आहे. या केसमध्ये ग्राहकाने वास्तविक युनिटचा वापर केला आहे, तथापि वि.प.च्या चुकीच्या व वेळोवेळी नोंदी न घेतल्यामुळे झालेल्या नुकसानीस व जमा न होणाऱ्या महसुलास वि.प.चा बिलींग विभाग जबाबदार असल्याने तत्कालीन संबंधितांवर उचित कारवाई होणे योग्य आहे असे मंच नमूद करीत आहे व त्यानुसार मुद्दा क्र. १ चे उत्तर ' होय ' असे दिले आहे. तथापि ग्राहकाने विनियम १५ : ४ या तरतुदीचा उल्लेख करुन मीटर सदोष असल्यस देयक तयार करतांना या तरतुदीप्रमाणे जास्तीत जास्त ३ महिन्याच्या कालावधीचे बील मिळावे असे नमूद केले आहे. तथापि सदरची तरतूदीचा विचार करणे योग्य नाही असे मंचाचे मत आहे, मात्र मिटरच्या नोंदी घेणे ही १४:३ ची तरतूद विचारांत घेणे योग्य आहे असे मंचाचे मत आहे. त्यामुळे मंचाने सारासार विचार करुन मीटर बदलल्यापासून एकूण वापरलेले युनिट व त्याचा कालावधी याचा विचार करुन पूर्ण कालावधीतील बील व जमा रक्कम याचा मेळ घालून नव्याने बील करुन द्यावे असे मंचाचे मत आहे. त्यासाठी पुढील प्रमाणे तपशीलाचा बिलासाठी उपयोग करावा. सदरचे वादातील मीटर ऑक्टोबर २००३ मध्ये युनिट १ पासून चालू झालेले आहे व ते दि. ३.३.२०१२ पर्यंत ९४२६ इतक्या रिडींगवर बदललेले आहे. याचाच अर्थ एकंदर ८ वर्षे ३ महिने या ९९ महिन्याच्या कालावधीत ९४२५ इतके युनिट वापरले आहेत. म्हणजे प्रतिमहा ९५ युनिट या प्रमाणे तिमाही बील करीत असतांना २८५ युनिट गृहीत धरुन तत्कालीन काळातील मा.आयोगाच्या दरसूचीप्रमाणे वर सांगितलेल्या कालावधीतील बीले याचे एकत्रित पत्रक तयार करुन त्याप्रमाणे ग्राहकाने जमा केलेली रक्कम वजावट करुन नव्याने बील देण्यात यावे. यापूर्वी वि.प.कडून दिलेली सर्व बीले रद्द करण्यात यावीत असे मंच सूचित करीत आहे. त्याचप्रमाणे ग्राहकाने जानेवारी २०१२ व एप्रिल २०१२ या काळात वापर केलेल्या युनिटची बीले वरील बिलासोबत दोन्हीही रकमा एकत्रित करुन दोन हप्त्यात भरावीत असेही मंच सूचित करीत आहे. ग्राहकाने आपल्या तक्रारीत मागणी केल्याप्रमाणे जानेवारी २००५ पासून विभागणी न करता मीटर बदललेल्या तारखेपासून विभागणी मंचाने केली आहे.

This document was created using SmartPDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

वि.प.चा बिलींग विभागाने अत्यंत कार्यक्षमपणे काम करणे योग्य आहे. तसेच सर्व प्रकारच्या नोंदी वेळच्यावेळी व योग्य प्रकारे करणे आवश्यक असूनही तशा नोंदी केल्या जात नसल्यामुळे, त्याचप्रमाणे मंजूर भार, एकंदरीत वि.प. करीत असलेला वीज पुरवठ्याचे तास याचाही विचार करुन किती रिडींग प्रमाणे वापर होऊ शकतो, ग्राहकास दिलेली बीले योग्य आहेत किंवा कसे याची कनिष्ठ स्तरापासून विभागीय लेखापर्यंत माहिती असणे व त्याप्रमाणे बील आहे किंवा नाही याची शहानिशा करुन ते दुरुस्त करुन देणे योग्य आहे. तसे संबंधित व अन्य प्रकरणी होत नसल्याने ग्राहकास मंचाचा दरवाजा ठोठावा लागत आहे, ही बाब वि.प.च्या दृष्टीने खेदजनक व चिंताजनक आहे. वापर युनिट व त्या अनुषंगाने दिले जाणारे बील ही बाब वि.प.चा महसुल व कामकाजाच्या दृष्टीने जबाबदारीची असूनही त्याकडे दूर्लक्ष, चालढकल, चुकीच्या व अपुऱ्या नोंदी केल्या जात आहेत, याचा विचार वि.प.च्या बिलींग विभागाने करणे आवश्यक आहे असे मंच स्पष्टपणे नमूद करीत आहे. त्यामुळेच मुद्दा क्र. २ चे उत्तर ‘ होय ‘ असे देण्यात येत आहे. सर्व बाबींचा परामर्श घेता, मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) तपशिलात नमूद केल्याप्रमाणे ऑक्टोबर २००३ पासून दि. ३.३.२०१२ पर्यंत ९४२५ युनिटचे ९९ महिन्यांच्या कालावधीचे बील तत्कालीन वेळेच्या आयोगाच्या दरपत्रका-प्रमाणे प्रति तिमाही २८५ युनिट प्रमाणे नव्याने दुरुस्त करुन देण्यात यावे.

२) बील दुरुस्ती नंतर ग्राहकाच्या जमा रकमा व देय रक्कम याचा तपशील ग्राहकास योग्य प्रकारे लेखी स्वरुपात कळविणे व तसे मंचास कळवावे.

३) सर्व हिशोब पत्रक तयार झाल्यावर ग्राहकाने आपली रक्कम दोन हप्त्यात जमा करावी. या सर्व बाबी मंचास कळवाव्यात.

४) या पूर्वी दिलेली सर्व बीले रद्द करण्यात यावीत.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com